१६।१०।२०२५

# अभंग रसग्रहण

## अभंग - 'डोईचा पदर आला खांद्यावर' - संत जनाबाई

आपल्या महाराष्ट्राला समृध्द संत वाङ्मयाचा वरदहस्त आणि परंपरा आहे. स्त्री संतांमधील जनाबाई या प्रामुख्याने आपल्या परिचयाच्या. त्यांचे 'विठू माझा लेकुरवाळा', 'रजाई गोणाई अखंडित तुझे पायी' किंवा 'धरिला पंढरीचा चोर' हे अभंग सर्वांना परिचित आहेतच. पण मला त्यांचा 'डोईचा पदर...' हा अभंग खूप भावतो.

परभणी जिल्ह्यातल्या 'गंगाखेड' या गावी दमा व कुरुंड या शुद्र दामत्याच्या पोटी जनाबाई यांचा जन्म झाला. त्यांचे आई-वडिल विठ्ठल भक्त होते. त्यांच्या मृत्यूनंतर जनाबाई दामाशेठ शिंपी (संत नामदेवांचे वडिल) यांच्या आश्रयाला आल्या. आणि आयुष्यभर तिथल्याच होऊन राहिल्या. त्यांच्या घरची सगळी कष्टाची कामं त्या करित. नामदेव त्यांच्यापेक्षा ५-६ वर्षांनी लहान, त्यामुळे त्यांच्यावर जनाबाईंची विशेष माया होती, जी नंतर भक्तीत बदलली. नामदेवांच्या परिवारातील सुख-दुःख त्यांनी आपली मानली. संत नामदेवांचे लौकिक जीवन आणि आध्यात्मिक प्रवास त्यांनी जवळून बघीतला. उत्कट, संवेदशील मनामुळे नामदेवांची विठ्ठलाप्रति भक्ती, हा त्यांच्या निरिक्षण, कुतुहल आणि चिंतनाचा विषय ठरला. त्यामुळे त्यांच्या आध्यात्मिक, भक्तीमय जीवनाला प्रारंभ झाला.

जनाबाई म्हणजे विलक्षण बुध्दीमत्ता असलेले संवेदशील 'स्त्रीमन'. त्यांचे सारे जीवन कष्टमय होते. त्यात 'क्षुद्र' म्हणून अपमान होई. आणि याच त्यांच्या जीवन-व्यवहार पध्दतीतून त्यांची अभंग रचना घडली, जी अतिशय चोख, भावनोत्कट आणि रसाळ आहे. त्या विठ्ठलाशी एकरूप होतात की, त्यांना सर्वत्र विठ्ठलाचा भास होतो. दळण, कांडण, पाणी भरणे, न्हाणे इ. कामात त्यांना तो मदत करतो.

२

एकदा विठ्ठल त्यांच्याकडे रात्रीला मुक्कामी येतो, आणि सकाळ झाल्यावर घाईने परतून जाताना त्याचे गळ्यातले सोन्याचे पदक तिथेच विसरतो. ते पदक चोरल्याचा आळ जनाबाईवर येतो. त्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले जाते. सुळावर देण्याची शिक्षा होते. त्यांची बाजू घेऊन त्यांना निर्दोष साबित करणारं कोणीच नसतं. जनाबाईचा राग अनावर होतो. प्रतिकूल परिस्थिती, उपेक्षा यामुळे त्यांचे संतप्त, विद्रोही मन संघर्षाची भाषा बोलू लागते. आणि हा अभंग त्यांच्या ओठी येतो...

डोईचा पदर आला खांद्यावरी ।
भरल्या बाजारी जाईन मी ॥
हाती घेईन टाळ, खांद्यावरी वीणा ।
आता मज मना कोण करी ॥
पंढरीच्या पेठे मांडीयले पाल ।
मनगटावर तेल घाला तुम्ही ॥
जनी म्हणे मी झाले वेसवा ।
रिघाले केशवा घर तुझे ॥

त्या काळचे सभ्यतेचे एक प्रतीक किंवा संकेत म्हणजे डोईवरचा पदर! त्यांच्यावर आलेल्या खोट्या आळामुळे दुखावल्या जाऊन म्हणतात, 'डोईचा पदर आता खांद्यावर आला, आता मला कुठली भीड? अन कुठला संकोच? हातात टाळ आणि खांद्यावर वीणा घेऊन मी भरल्या बाजारी जाईन आणि मनसोक्त भजन गाईन. भक्तजनांच्या दिंडित सामील होईन, जे मी आधी करू शकत नव्हते. आधी मला अनाथ, क्षुद्र म्हणून हिणवले, आता हा चोरीचा आळ. मला आता ना घर, ना दार! ना प्रपंच, ना माझा कोणी कैवारी... मग मी आता

कोणाला कशाला घाबरू! हे विठ्ठला तू दिलेली अवघी निंदा आता मी स्वीकारली आहे. आणि भय, लज्जा, संकोच टाकून तुझी वेसवा झाले आहे. आता तुझे स्थान तेच माझे घर! मी क्षुद्र दासी असल्याने, मला तुझ्या मंदिराच्या उंबऱ्याशीही येण्याची परवानगी नव्हती पण आता कोणाच्या परवानगीची काय गरज? अति झालं आणि हसू आलं. मी सगळं सोडून तुझ्याकडे आले आहे. तू तार अथवा मार.

या आत्मसमर्पणपर लिहिलेल्या अभंगात जनाबाईंचे स्तिमित करणारे अपूर्व रूप दिसते. भावपूर्ण प्रांजळ थेटपणा पहायला मिळतो. दुखावल्या गेलेल्या स्त्रीचा संतप्त आक्रोश कळतो. अतिशय सुंदर असा अभंग, आपल्या मनालाही हेलावतो.

जनाबाईंचा आध्यात्मिक प्रवास सगुण भक्तीने नामदेवांची कास धरून प्रारंभीत होतो. तिथून पुढे संत ज्ञानेश्वरांच्या 'योग - अद्वैत' मार्गावर वाटचाल करत त्यांनी आत्मज्ञान प्राप्त केले. आपल्या 'स्त्रीत्वाचा' उंबरठा ओलांडून प्राप्त जीवनात निर्गुण भक्तीची गुंफण करून जीवन सफल केले. त्यांच्या प्रत्येक कामात त्यांनी विठ्ठल पाहिला आणि एक एक पायरी चढत हीनत्वाचा, दास्यत्वाचा, स्त्रीत्वाचा, निरक्षरतेचा, भक्तीचा आणि शेवटी अद्वैताचा 'उंबरठा' ओलांडून ईश्वरचरणी लीन झाल्या.



यामिनी पाठक
O बिल्डिंग, हिल व्ह्यू रेसिडेन्सी
फोन - ७४९९९५२७५७.